**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे विभागातील गट ड संवर्गातील पदे (दप्तरबंद,नाईक,शिपाई, पहारेकरी, सफाईगार, माळी) बाह्ययंत्रणेव्दारे भरण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: आस्थाप-२०२६/११७९/ प्र.क्र.२९३/मुद्रांक-१**

**हुतात्मा राजगुरु चौक,मादामा कामा मार्ग,**

**मंत्रालय,मुंबई ४०००३२**

**दिनांक : १६ ऑक्टोबर २०२६**

**संदर्भ** : - १) शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामागार विभाग, भांखस -२०१४/प्र.क्र.८२/भाग- III/उद्योग -४, दि. ०१ डिसेंबर २०१६

२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग भांखस -२०२१/प्र.क्र.८/ डद्योग-४/ , दि. ०७ मे, २०२१

३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र परनि-२०२२/प्र.क्र.१५/८ आ.पु.क, दि २७ एप्रिल, २०२२

४)शासन निर्णय, महसूल विभाग आस्थाप-२०२३/११३५/प्र.क्र.२३९/मुद्रांक-१, दि. ०४ डिसेंबर, २०२५

**प्रस्तावना**

संदर्भाधीन क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये महसूल विभागाच्या अधिपत्याखलील नोंदणी व मुद्रांक विभागातील पदांचा सुधारीत आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. प्रस्तूत शासन निर्णयानुसार गट-ड संवर्गातील खाली नमुद केलेल्या रिक्त पदांच्या सेवा बाह्ययंत्रणेमार्फत घ्यावयाच्या आहेत:-

| अ.क्र. | शासन निर्णयातील अ.क्र. | पदनाम | गट | रिक्त पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १ | ३९ | दप्तरबंद | गट-ड | ४१ |
| २ | ४० | नाईक | गट-ड | ०२ |
| ३ | ४२ | शिपाई | गट-ड | १४८ |
| ४ | ४३ | पहारेकरी | गट-ड | १२ |
| ५ | ४४ | सफाईगार | गट-ड | ३ |
| ६ | ४६ | माळी | गट-ड | १ |
| | | | **एकुण** | **२०७** |

या अनुषंगाने, नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयासाठी वरील "गट-ड" ची २०७ पदे बाह्ययंत्रणेव्दारे भरण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयासाठी बाह्ययंत्रणेव्दारे "गट-ड" पदे भरण्यास प्रशासकीय मान्यता व सदर पदांच्या वेतनापोटी होणाऱ्या वित्तीय खर्चास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

अ) बाह्ययंत्रणेव्दारे सेवा घेताना, वित्त विभागाच्या दिनांक २७.०४.२०२२ रोजीच्या शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

आ) बाह्ययंत्रणेव्दारे गट-ड हे पद घेताना त्यांच्या सेवेचे कोणतही उत्तरदायित्व शासनावर येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच बाह्ययंत्रणेव्दारे सेवा उपलब्ध करुन घेताना प्रचलित कायद्याचा भंग होणार याची काळजी विभागप्रमुख/कार्यालय प्रमुखांनी घ्यावी.

इ) बाह्ययंत्रणेव्दारे गट-ड या पदांची सेवा संबंधित कंत्राटदार/पुरवठादारा मार्फत घेताना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक दि. ०१ डिसेंबर, २०१६ व दि. ७ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील अटींचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

२. उपरोक्त बाबींकरिता होणारा खर्च मागणी क्र C-०२, २०३०-मुद्रांक व नोंदणी, ००१ मार्गदर्शन व प्रशासन,(०१)(०१) नोंदणी महानिरीक्षक आणि जिल्हा निबंधक (२०३० ०१०९), १० -कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थ्ळावर उपलबध करण्यात अली असून त्याचा सांकेतांक २०२६१०१६११२७३४२३४८ असा आहे, सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRITEE RUPESH NARKHEDE

Digitally signed by PRITEE RUPESH NARKHEDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Dept, 2.5.4.20=FF1E52AFECDE7DEA903FDC76B379E814A7D58C3484834F6D6A595154FD33A567, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=758347BFF5C5797BBDE91B460061EE2DD9AD8956F923F7CDCAD387E5A0450D0A, cn=PRITEE RUPESH NARKHEDE
Date: 2026.10.16 11:29:50 +05'30'

**(प्रिती नारखेडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत,**

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
२. महालेखापाल, महाराष्ट्र -१/ २ (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
३. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांचेमार्फत)
४. कार्यासन (आ.पु.क.), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
५. निवडनस्ती (मुद्रांक-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.